दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | सोमवार, 29 जून 2026 | अंक क्र. 55 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com



## उच्च दूध उत्पादनासाठी जातिवंत गाई, शास्त्रशुद्ध व्यवस्थापन आणि मुरघास आवश्यक : डॉ. शैलेश मदने

### आ. सुरेश धस यांच्या उपस्थितीत मोरेश्वर मंगल कार्यालयात दुग्ध व्यवसाय मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात

**आष्टी प्रतिनिधी :**

दुग्ध व्यवसाय हा केवळ जोडधंदा नसून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारा शाश्वत उद्योग आहे. हा व्यवसाय अधिक फायदेशीर करायचा असेल तर गोठ्यात किमान ३५ ते ४० लिटरपेक्षा अधिक दूध देणाऱ्या उच्च दर्जाच्या जातिवंत गाई असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय विक्री व्यवस्थापक तथा दुग्ध व्यवसाय तज्ज्ञ डॉ. शैलेश मदने यांनी केले.

मोरेश्वर मंगल कार्यालय येथे आयोजित दुग्ध व्यवसाय, मुरघास व्यवस्थापन आणि पशुपालनातील आधुनिक तंत्रज्ञान या विषयावरील मार्गदर्शन कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमास आमदार सुरेश धस यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मोठ्या संख्येने शेतकरी, दूध उत्पादक आणि पशुपालक उपस्थित होते.

डॉ. मदने यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील प्रत्येक गोठ्यात सुमारे १० ते २० टक्के गाई अंगावर सांभाळाव्या लागतात. त्यामुळे गोठ्यात उच्च दूध उत्पादन देणाऱ्या उत्कृष्ट वंशाच्या गाई असणे अत्यंत गरजेचे आहे. योग्य आहार, संतुलित पोषण, शास्त्रशुद्ध व्यवस्थापन आणि नियोजनबद्ध प्रजनन यांचा अवलंब केल्यास गायींची दूध देण्याची क्षमता मोठ्या प्रमाणात वाढविता येते.

मुरघास (सायलेज) निर्मितीबाबत मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, मुरघास तयार करताना पहिला थर व्यवस्थित चोपून घेतल्यास तो अधिक काळ टिकतो आणि त्याचा दर्जाही चांगला राहतो. तसेच मुरघासातील प्रथिनांचे प्रमाण तपासण्यासाठी प्रयोगशाळेत चाचणी करणे आवश्यक असून प्रत्येक शेतकऱ्याच्या गोठ्यात किमान ९ ते १२ महिन्यांचा मुरघास साठा उपलब्ध असावा.

ते पुढे म्हणाले की, चांगल्या जातिवंत गायीचा जन्म झाल्यानंतर तिचे योग्य संगोपन, संतुलित आहार आणि शास्त्रशुद्ध नियोजन केल्यास ती ४० लिटरपर्यंत दूध देऊ शकते. दूध उत्पादन वाढविण्यासाठी गायीची प्रसूती नैसर्गिक व सुरळीत होणे महत्त्वाचे आहे. अनेकदा गाई दूध कमी देत असल्याची तक्रार केली जाते; मात्र त्यामागे व्यवस्थापनातील त्रुटी हेच प्रमुख कारण असते. आजही सुमारे ९५ टक्के पशुपालक दुग्ध व्यवसाय पूर्णपणे शास्त्रशुद्ध पद्धतीने करत नसल्याचे त्यांनी नमूद केले.

"ब्रीडिंग म्हणजे केवळ कृत्रिम रेतन नव्हे, तर गायीला समजून घेण्याची आणि तिच्या क्षमतेचा योग्य विकास करण्याची प्रक्रिया आहे," असे सांगत त्यांनी आधुनिक पशुपालनातील विविध तांत्रिक बाबींवर उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले की, शेतीसोबत दुग्ध व्यवसाय हा शेतकऱ्यांना सन्मान, रोजगार आणि आर्थिक स्थैर्य मिळवून देणारा महत्त्वाचा उद्योग आहे. शेतकऱ्यांची आर्थिक पत वाढविण्याची क्षमता या व्यवसायात असून त्याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

डॉ. शैलेश मदने यांनी दुग्ध व्यवसाय, मुरघास निर्मिती आणि पशुपालन क्षेत्रात राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कार्य केले असल्याचे सांगत, त्यांच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा लाभ राज्यातील अधिकाधिक शेतकऱ्यांना व्हावा, यासाठी त्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून सातत्याने मार्गदर्शन करावे, अशी विनंतीही आमदार सुरेश धस यांनी केली.

"आज सोशल मीडियावर अनेक अनावश्यक गोष्टींमध्ये वेळ वाया जात आहे. अशा परिस्थितीत शेतकरी आणि दूध उत्पादकांना उपयुक्त, वैज्ञानिक आणि विश्वासार्ह माहिती मिळावी यासाठी डॉ. मदने यांनी समाजहिताच्या दृष्टीने सोशल मीडियावर अधिक सक्रिय राहून मार्गदर्शन करावे," असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. या मार्गदर्शन कार्यक्रमामुळे आधुनिक दुग्ध व्यवसाय, मुरघास निर्मिती, पशुपालन व्यवस्थापन आणि उच्च दूध उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या वैज्ञानिक पद्धतींबाबत शेतकऱ्यांना सखोल माहिती मिळाली. यावेळी डॉ. उपेंद्र मुंडे (सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन तथा तालुका पशुसंवर्धन अधिकारी, आष्टी), श्री. संजय सालुगडे पाटील (अध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह ब्रीडर फार्मर्स असोसिएशन) यांच्यासह राज्यातील विविध भागांतील प्रगतशील दूध उत्पादक श्री. रामनाथ वदक (संगमनेर), श्री. गजानन शेवाळे (धाराशिव), श्री. हरिश येडे (पुणे), श्री. निलेश दहें (कोपरगाव), श्री. बाबासाहेब पवार, श्री. माऊली भिलारे (सातारा), श्री. अशोक हाके (पुणे), श्री. महादेव धुगे (हिंगोली), श्री. वामन गायकवाड (सोलापूर), श्री. रवी हासे (संगमनेर), श्री. संतोष पाटील (चिलेवाडी, सातारा), श्री. जयराम खपके (राहुरी), श्री. जयवंत ताकते (राहुरी), डॉ. चंदन संभेराव (आळेफाटा), श्री. प्रतीक डोखे (कोल्हार), श्री. माणिक पांडे (अकोले) तसेच श्रद्धा ढवण (पारनेर) उपस्थित होते.कार्यक्रमात उपस्थित मान्यवर, प्रगतशील दूध उत्पादक, पदाधिकारी व शेतकरी बांधवांशी संवाद साधत दुग्ध व्यवसायाच्या विकासासाठी अशा मार्गदर्शनपर उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली.

## सेशेल्स दौऱ्यात भारताचे मोठे पाऊल

**सेशेल्स : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सेशेल्स दौऱ्यात भारत आणि सेशेल्स यांच्यातील संबंध अधिक मजबूत करण्यासाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. राष्ट्राध्यक्ष पॅट्रिक हर्मिनी यांच्यासोबत झालेल्या शिष्टमंडळ स्तरावरील बैठकीत संरक्षण, सागरी सुरक्षा, आरोग्य, डिजिटल पेमेंट, शिक्षण, कृषी आणि अंतराळ क्षेत्रातील सहकार्य वाढवण्यावर चर्चा झाली. या दौऱ्यात दोन्ही देशांमध्ये एकूण १९ करार आणि विविध उपक्रमांची घोषणा करण्यात आली.

बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हिंद महासागर हा भारत आणि सेशेल्सचा समान वारसा असल्याचे सांगितले. या क्षेत्राची सुरक्षा, स्थिरता आणि विकास ही दोन्ही देशांची संयुक्त जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. भारताचा उद्देश हिंद महासागराला संधी आणि विकासाचा महासागर बनवण्याचा असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### भारत-सेशेल्स १९ करारांवर स्वाक्षरी

या भेटीदरम्यान संरक्षण आणि सागरी सुरक्षेला विशेष महत्त्व देण्यात आले. दोन्ही देशांनी चाचेगिरी, अमली पदार्थांची तस्करी, अवैध मासेमारी आणि सीमापार गुन्हेगारी रोखण्यासाठी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. भारताने सेशेल्सला एक वेगवान गस्ती जहाज, १० उपयुक्त वाहने, ५ लेझर रेडियल बोटी, ६ रुग्णवाहिका, ५०० मेट्रिक टन तांदूळ आणि ८,५०० मेट्रिक टन सिमेंट भेट देण्याची घोषणा केली. तसेच सेशेल्स तटरक्षक दलाच्या एका जहाजाची दुरुस्ती आणि डॉर्नियर विमानाच्या आधुनिकीकरणाचे काम पूर्ण झाल्याची माहितीही देण्यात आली.

### डिजिटल पेमेंट करण्यासंदर्भात सामंजस्य करार

डिजिटल क्षेत्रातही महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. भारतातील आधारित डिजिटल पेमेंट प्रणाली सेशेल्समध्ये सुरू करण्यासाठी संबंधित संस्थांमध्ये सामंजस्य करार करण्यात आला. याशिवाय जन औषधी योजनेअंतर्गत भारतीय औषधे उपलब्ध करून देण्यासाठीही स्वतंत्र करार करण्यात आला.


सेशेल्सच्या स्वातंत्र्याला ५० वर्षे आणि भारत-सेशेल्स राजनैतिक संबंधांना ५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने विशेष स्मृतिचिन्ह लोगोचेही अनावरण करण्यात आले. पंतप्रधान मोदी या दौऱ्यात सेशेल्सच्या राष्ट्रीय दिनाच्या कार्यक्रमालाही प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

## गणपतीपुळे दुर्घटनेतील उर्वरित चार तरुणांचे मृतदेहही सापडले

**रत्नागिरी : वृत्तसंस्था**

गणपतीपुळे येथे पर्यटनासाठी आलेल्या आणि समुद्रात बुडून बेपत्ता झालेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील राहिलेल्या चारही तरुणांचे मृतदेह शोधण्यात प्रशासनाला यश आले आहे.पोलीस, कोस्टगार्ड, जीवरक्षक, मच्छीमार आणि स्थानिक नागरिकांच्या संयुक्त शोधमोहीमेनंतर सर्व मृतदेह समुद्रातून बाहेर काढण्यात आले. या दुर्दैवी घटनेमुळे गणपतीपुळे परिसरासह छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात शोककळा पसरली आहे.

शनिवारी, दि. २० जून रोजी झालेल्या या दुर्घटनेत बुडालेल्या पाच जणांपैकी प्रेम दीपक आदमाने (१९) याचा मृतदेह काल सापडला होता. आदित्य संतोष राऊत (२२), अनिकेत बंडू हिवराळे (२०), आनंद राजू नरवडे (२०), आणि यश रामेश्वर कांबळे (१९) यांचे मृतदेह आज सापडले. हे सर्व युवक बिडकीन (ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर) येथील रहिवासी होते. घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस प्रशासन, कोस्टगार्ड, जीवरक्षक पथक तसेच स्थानिक मच्छीमार आणि ग्रामस्थांनी तातडीने शोधकार्य सुरू केले. समुद्रातील प्रतिकूल परिस्थिती आणि भरती-ओहोटीच्या आव्हानांवर मात करत सलग शोधमोहीम राबविण्यात आली. अथक प्रयत्नांनंतर अखेर सर्व युवकांचे मृतदेह शोधण्यात यश आले. शोधमोहिमेदरम्यान जिल्हा पोलीस अधीक्षक नितीन बगाटे, अप्पर पोलीस अधीक्षक बी. बी. महामुनी, उपविभागीय पोलीस अधिकारी नीलेश माईनकर तसेच जयगड पोलीस ठाण्याचे निरीक्षक संजय पाटील यांनी घटनास्थळी उपस्थित राहून मोहिमेचा आढावा घेतला.



## ना. पंकजाताई मुंडेंनी भाजपा कार्यकर्त्यांसमवेत ऐकली पंतप्रधान मोदींची 'मन की बात'

**मुंबई वृत्तसंस्था**

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा 'मन की बात' कार्यक्रम आज माझगाव येथे भाजपा कार्यकर्त्यां समवेत बसून ऐकला. मोदींजीचे राष्ट्रहिताचे विचार उर्जादायी असतात अशी प्रतिक्रिया त्यांनी यावेळी दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा 'मन की बात' कार्यक्रम प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या रविवारी असतो, पंतप्रधान या माध्यमातून वेगवेगळ्या विषयांवर जनतेशी संवाद साधत असतात. आज मुंबई भाजयुमो आयोजित 'मन की बात - जी नेक्स्ट सोबत' या कार्यक्रमात सहभागी होऊन ना. पंकजाताईंनी नरेंद्रजी मोदी यांचे विचार ऐकले. माझगाव येथील मॅकडोनाल्ड्समध्ये आजच्या तरुण पिढीसोबत राष्ट्रहिताचे हे विचार ऐकणे अतिशय ऊर्जादायी ठरले असल्याचे त्या म्हणाल्या.

## राज्यात पुन्हा पावसाची दमदार एन्ट्री!

**मुंबई** : गेल्या काही दिवसांपासून विश्रांती घेतलेल्या मान्सूनने राज्यात पुन्हा जोरदार पुनरागमन केले आहे. मुंबई, उपनगर आणि ठाण्यात रविवारी मध्यरात्रीनंतर मुसळधार पावसाने हजेरी लावली. ठाण्यात अवघ्या एका तासात २९ मिमी पावसाची नोंद झाली. दरम्यान, भारतीय हवामान विभागाने (IMD) राज्यातील २२ जिल्ह्यांसाठी पावसाचा इशारा जारी केला असून, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट, तर २० जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, विदर्भातील चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांत काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. याशिवाय कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांत मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि ताशी ३० ते ४० किमी वेगाने वारे वाहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मनावर संस्कार करणाऱ्या उपक्रमांच्या आयोजनातून शिक्षकांनी विद्यार्थी घडवावेत : वसंतराव देशमुख

### भाशिप्र संस्था वर्धापननिमित्त ध्वजारोहण व अमृत महोत्सवी मानचिन्हाचे अनावरण






**अंबाजोगाई प्रतिनिधी**

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेतून चांगले संस्कार दिले जातात. बलोपासक कलोपासक आणि ज्ञानोपासक मंडळातून विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधला जातो म्हणून शिक्षकांनी मनावर संस्कार करणारे उपक्रम किंवा कार्यक्रम आयोजित करून सक्षम विद्यार्थी घडवला पाहिजे असे आवाहन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे माजी कार्यवाह वसंतराव देशमुख यांनी केले. ते भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाईच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खोलेश्वर शैक्षणिक संकुल स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष डॉ.अतुलराव देशपांडे तसेच स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह किरण कोदरकर, संस्थेचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य तथा महाविद्यालयीन विकास समितीचे अध्यक्ष रामभाऊ कुलकर्णी, संस्थेचे केंद्र कार्यकारणी सदस्य विष्णू सोनवणे, डॉ.कल्पनाताई चौसाळकर सौ.वर्षाताई मुंडे, नितीन चौधरी, विष्णू सोनवणे, तसेच शालेय समितीचे अध्यक्ष उन्मेश मातेकर खोलेश्वर जिनियस स्कूलचे अध्यक्ष डॉ.गोपाळराव चौसाळकर आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.

पुढे बोलताना वसंतराव देशमुख यांनी शिक्षण आणि अनुशासन या विषयासंबंधी उपस्थित शिक्षकवृंदांसमोर संवाद साधला त्यांनी आपल्या मनोगतामध्ये मी प्रथम शिक्षक कार्यकर्ता आहे. भारतीय शिक्षण प्रसारक संस्थे भोवती असणारा प्रत्येक शिक्षक हा कार्यकर्ता आहे म्हणून कार्यकर्त्यांनी आपल्या पूर्वजांनी केलेला त्या समर्पण भावना जोपासली पाहिजे असेही त्यांनी सांगितले, मनाचा विकास करणाऱ्या कलोपासक ज्ञानोपासक आणि बलोपासक या मंडळातून विद्यार्थ्यांचा विकास करावा आणि विद्यार्थ्यांमध्ये खिलाडू वृत्ती निर्माण करावी असेही आपल्या मनोगतातून इच्छा व्यक्त केली. जुन्या काळामध्ये गुरूजींचा मान होता तो आता बदलत चालला आहे. पंचकोश विकास प्रशिक्षणाचा महत्त्वाचा दृष्टिकोन शिक्षकाने विकसित करावा तसेच नवीन शैक्षणिक धोरणामध्ये सांगितलेल्या धोरणानुसार शिक्षकांनी अभ्यास करून योग्य तो शिक्षकांचा सन्मान परत प्राप्त करावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

पगारापुरते काम न करता असेही त्यांनी आवाहन केले तसेच चारित्र्य निर्माण करणारे शिक्षण असावे शिक्षकांनी आपल्या ज्ञानदानात नेहमी सक्रीय राहिलं पाहिजे विद्यार्थी शिक्षक ज्ञानदानात रमले पाहिजे असाही त्यांनी आग्रह धरला. यावेळी अध्यक्षीय समारोपात डॉ.अतुलराव देशपांडे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, संस्थेचे हे अमृत महोत्सवी वर्ष आहे. शिक्षकांनी माझी संस्था म्हणून काम केलं पाहिजे शिक्षण क्षेत्रात वाटचाल करीत असताना संस्था आपल्या हृदयात उतरली असेल त्या ठिकाणी संस्थेचे हित जोपासले जाते. जुन्या काळच्या शिक्षकांनी संस्थेचा विकास केला प्रगती केली. आज पूर्वजांनी संस्थेसाठी केलेले प्रयत्न समर्पण आणि योगदान याचा आदर्श शिक्षकांनी डोळ्यांसमोर ठेवावा असेही आव्हान केले.

प्रास्ताविकामध्ये किरण कोदरकर यांनी एखादी संस्था ७५ वर्षांत म्हणजे अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे ही सार्थ अभिमानाची बाब आहे, शैक्षणिक प्रवास संस्थेचा अविरत चालू आहे म्हणून जुन्या शिक्षक कार्यकर्त्यांकडून प्रयत्नांची ऊर्जा आपण सर्वांनी घेतली पाहिजे, आज संस्थेचा आगळावेगळा वर्धापन दिन साजरा होत आहे. शिक्षक कार्यकर्त्यांनी निर्माण केलेली संस्था आपल्या विचारांशी बांधील असल्यामुळे आज भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचा नांवलौकिक झाला असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी सर्व मान्यवरांचे यथोचित स्वागत करण्यात आले तसेच खोलेश्वर शैक्षणिक संकुलामध्ये भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अमृत महोत्सवी वर्ष प्रतिक चिन्हाचे विमोचन देखील करण्यात आले. डॉ.अतुलराव देशपांडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी माजी कार्यवाह धाट सर, माध्यमिक शालेय समिती अध्यक्ष अविनाश मुडेगावकर, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अविनाश तळणीकर, तुळशीराम धायगुडे अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वप्रा सेलूकर आणि राजेंद्र शेप यांनी केले. तर उपस्थितांचे आभार महाविद्यालयीन विकास समितीचे अध्यक्ष तथा केंद्रीय कार्यकारणी सदस्य रामभाऊ कुलकर्णी यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता कल्याण मंत्राने झाली.

यावेळी संस्थेचे हितचिंतक, संस्थेचे सभासद, सर्व संस्कार केंद्रप्रमुख, शिक्षक बंधू-भगिनी, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.a

# राजकारणाने मला निवडले; बाबांचे जाणे आयुष्याला कलाटणी देणारे ठरले"

## 'सर्व काही' पॉडकास्टवर ना.पंकजाताई मुंडे यांची दमदार मुलाखत ; मनमोकळ्या गप्पा, दिलखुलास उत्तरे

■ मुंबई वृत्तसंस्था

"मला कधीच राजकारणात यायचे नव्हते. माझी स्वतःची वेगळी स्वप्ने होती. बाबा असताना परिस्थिती अशी आली की एका दिवसांत सगळं बदललं आणि मी राजकारणात आले. मात्र ३ जून २०१४ रोजी घडलेल्या एका घटनेने माझे संपूर्ण आयुष्यच बदलून गेले. परिस्थिती अशी निर्माण झाली की, मी राजकारण निवडले नाही तर राजकारणानेच मला निवडले," अशा शब्दांत राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी एका विशेष मुलाखतीत आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली.

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या आठवणींना उजाळा देताना पंकजाताई मुंडे यांनी त्यांच्या निधनानंतरच्या संघर्षाचा, राजकारणातील प्रवासाचा आणि वडिलांकडून मिळालेल्या संस्कारांचा भावनिक प्रवास उलगडणारी एक दमदार मुलाखत 'सर्व काही' या पॉडकास्टवर प्रक्षेपित झाली आहे. डॉ मंजिरी पुराणिक यांनी ही मुलाखत घेतली आहे.

पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, ३ जून २०१४ हा दिवस त्यांच्या कुटुंबासाठीच नव्हे तर महाराष्ट्राच्या राजकारणासाठीही अत्यंत धक्कादायक ठरला. "त्या दिवशी बाबांच्या सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. घरात आनंदाचे वातावरण होते. आईने कार्यक्रमासाठी पैठणी तयार ठेवली होती, मी देखील नवीन पोशाख काढून ठेवला होता. मात्र, त्याच दिवशी बाबांच्या अपघाती निधनाची बातमी आली आणि सर्व काही बदलून गेले,"

"आज या घटनेला बारा वर्षे झाली असली तरी ती घटना आजही तितकीच ताजी आहे. अनेकदा असे वाटते की हे सर्व एखादे वाईट स्वप्न होते. दरवर्षी ३ जून जवळ आली की मन अस्वस्थ होते. विनाकारण चिडचिड होते, अस्वस्थता जाणवते. शरीराची एक स्मृती असते आणि त्या दुःखाची जाणीव पुन्हा ताजी होते," असे सांगताना त्या भावूक झाल्या.

### "बाबा माझे सुपरहिरो होते"

वडिलांविषयी बोलताना त्या म्हणाल्या "बाबा माझ्यासाठी केवळ वडील नव्हते, तर ते माझे सुपरहिरो होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा माझ्यावर मोठा प्रभाव आहे. आजही माझ्या बोलण्याच्या पद्धतीत, शरीरभाषेत लोकांना त्यांची झलक दिसते. अनेकदा माझ्याच एखाद्या कृतीत मला बाबांची आठवण येते." "माझे कौतुक व्हायला हवे असे प्रसंग जेव्हा येतात, तेव्हा बाबांची खूप आठवण येते. कारण माझ्या पाठीवर कौतुकाची थाप मारणारा, माझ्या यशात आनंद मानणारा माणूस आता माझ्यासोबत नाही."

### "अत्यंत व्यस्त असूनही कुटुंबासाठी वेळ द्यायचे"

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या कौटुंबिक आयुष्याबाबत सांगताना पंकजाताई म्हणाल्या, "बाबा अत्यंत व्यस्त असायचे. पक्ष संघटना उभारण्यापासून ते विरोधी पक्षनेते आणि नंतर गृहमंत्री म्हणून त्यांनी मोठी जबाबदारी सांभाळली. मात्र, एवढ्या व्यस्त वेळापत्रकातही त्यांनी कुटुंबासाठी वेळ काढणे कधी सोडले नाही." "आमचे वाढदिवस, लग्नाचे वाढदिवस, सण-उत्सव ते कधीच विसरत नसत. रात्री बारा वाजता वाढदिवस साजरा करण्यासाठी ते स्वतः उपस्थित राहायचे. कुटुंबातील प्रत्येक सदस्याशी त्यांचे घट्ट भावनिक नाते होते," असे त्यांनी सांगितले.








### "नैसर्गिक राहण्याची बाबांची शिकवण"

राजकारणातील आपल्या प्रवासावर बोलताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, बाबांनी त्यांना सर्वात महत्त्वाची शिकवण दिली ती म्हणजे नैसर्गिक राहण्याची. "राजकारणात आल्यानंतर अनेकदा प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र बाबा नेहमी म्हणायचे की, जशी आहेस तशीच राहा. लोकांशी प्रामाणिक आणि नैसर्गिक राहिल्यास त्यांच्याशी सहज नाते निर्माण होते. आज लोकांशी माझे असलेले नाते हे बाबांच्या या शिकवणीमुळेच आहे," असे त्यांनी सांगितले.

### "मंत्रीपद म्हणजे केवळ लोकसेवेचे माध्यम"

२०१४ मध्ये मंत्रीपदाची जबाबदारी मिळाल्यानंतरची भावना व्यक्त करताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या, "माझे मंत्री होणे ही केवळ राजकीय घटना नव्हती, तर लोकांनी गोपीनाथ मुंडे यांच्या कार्यावर दाखवलेला विश्वास होता. मंत्रिपद ही सत्ता नसून लोकांची कामे करण्याचे माध्यम आहे. माझ्या शपथविधीवेळी झालेला टाळ्यांचा कडकडाट हा माझ्यासाठी नव्हता, तर गोपीनाथराव मुंडे यांच्या कार्याला दिलेला सन्मान होता."

### "बाबा असते तर कदाचित मी राजकारणात नसते"

मुलाखतीच्या शेवटी पंकजा मुंडे यांनी एक भावनिक विधान केले. त्या म्हणाल्या, "बाबा आज असते तर कदाचित मी सक्रिय राजकारणात नसते. त्यांच्या निधनाच्या आदल्या दिवशीच मी त्यांना पुढील निवडणूक लढविणार नसल्याचे सांगितले होते. मला वेगळ्या क्षेत्रात काम करायचे होते. मात्र नियतीने वेगळेच ठरवले आणि मी राजकारणात कायमची आले."

### महाराष्ट्राची वाघीण, रणरागिणी उपाधी नंतर आता ' कल्याणी '

दरम्यान, या मुलाखतीत रॅपिड फायर या सत्रात पंकजाताई मुंडे यांना विविध प्रश्न विचारण्यात आले. या प्रश्नांची अतिशय चपखल उत्तरे त्यांनी दिली. या अनुषंगाने त्यांना विचारण्यात आलेल्या "तुमच्यावर चित्रपट करायचे ठरले तर त्याला काय नाव असेल" या प्रश्नावर उत्तर देताना त्यांनी "कल्याणी" असे सांगितले. आयुष्यभर आपल्या हातून सर्वांचे कल्याण व्हावे अशी अपेक्षा त्यांनी या निमित्ताने व्यक्त केली. पंकजाताई मुंडे यांच्या या मुलाखतीतून लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्याविषयी असलेले त्यांचे अपार प्रेम, राजकारणातील संघर्ष आणि वडिलांकडून मिळालेले जनसेवेचे संस्कार अधोरेखित झाले

---

# आस्थेच्या ठीकाणी चोरी करणाऱ्यां गुन्हेगारांच्या संपत्तीवर बुलडोझर चालवून कठोर शिक्षा द्यावी.

हिंदूंचे आस्थेचे अयोध्येतील भगवान राममंदिर आज जागतिक स्तरावर प्रसिद्ध मंदिर मानल्या जाते आणि अशा ठिकाणी देणगी चोरीचा प्रकार घडने अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.या मंदिरात दररोज लाखो भाविक आपली हजेरी लावतात.कारण भगवान राम हे संपूर्ण भारतवर्षाचे आस्थेचे प्रतीक आहे.अशा महत्वपूर्ण मंदिरात प्रत्येक भक्तगण फुल नाही फुलांची पाकळी म्हणून देणगीच्या रूपात देत असतात.अशा प्रकारे राममंदिरात देणगीच्या रूपात दररोज सुमारे २० लाख रूपयांपेक्षा जास्त देणगी जमा होत असते, याव्यतिरिक्त सोने-चांदी सारखे आभुषण देणगीच्या स्वरूपात मोठ्या प्रमाणात येत असल्याचे सांगितले जाते आणि यात ट्रस्टच्याच लोकांनी चोरांची टोळी तयार करून घृणीत कार्य करून चोरीचे घोर पाप केले आहे.कारण देशातील प्रत्येक भाविकांनी आपल्या आस्थेचे प्रतीक म्हणून राममंदिरात देणगी अर्पण करीत असतो आणि येथीलच लोकांनी व त्यांच्या नातेवाईकांनी देणगीच्या तिजोरीवर हात साफ केला हे घोर पाप कधीच धुतल्या जाणार नाही. कारण दानदाते गोरगरीब, सर्वसामान्य, शेतकरी,श्रीमंत अशा सर्वच स्तरातील भक्तांचा यात समावेश असतो आणि आहे.देणगी चोरीचा प्रकार अंदाजे २०० कोटी रूपयापर्यंत असल्याचे सांगितले जाते.परंतु देणगीच्या तिजोरीवर २०२० पासुनच चोरांची नजर असावी हेही लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे हा आकडा २००० कोटी रुपयांपेक्षा जास्त जावू शकतो.कारण यात सोने-चांदीचाही मोठ्या प्रमाणात समावेश आहे. देणगी चोरीमध्ये मोठमोठे दिग्गज सहभागी असु शकतात आणि आहेत त्यांची नावे समोर आणण्यास सरकार हिचकिचावत आहे यालाही नाकारता येत नाही. अयोध्येतील राम मंदिरात भाविकांकडून मिळालेल्या देणगीच्या अपहार प्रकरणात आठ जणांना अटक करण्यात आली आहे यात अविनाश शुक्ला,अनुकल्प मिश्रा,लवकुश मिश्रा,मनीष कुमार यादव,करूनेश पांडे, रामशंकर मिश्रा, सुभाष श्रीवास्तव, रामशंकर यादव, उर्फ टिन्नु या आठ जनांना अटक करण्यात आली आहे व यांना २९ जून पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. परंतु याप्रकरणातील मोठे आरोपी आणि मास्टरमाइंड अजुनही मोकाट फिरत आहेत.यांना सरकार बेड्या का ठोकत नाही?अयोध्येतील राममंदिर देणगी घोटाळा मोठ्या प्रमाणात असल्याने आणि आपल्या अंगलट येत असल्याचे पाहून श्री रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र विश्वस्त न्यासाचे सरचिटणीस चंपत राय आणि त्यांचे प्रभावशाली सदस्य डॉ.अनिल मिश्रा यांनी २६ जूनला आपल्या पदाचे राजीनामे दिले. याच्या पदाच्या राजीनाम्यामुळे स्पष्ट होते की देणगी चोरी प्रकरणात या दोघांचे हात अवश्य असुन मोठमोठे दिग्गज यात सहभागी असावे. माझ्या माहितीनुसार रामजन्मभूमी तिर्थक्षेत्र ट्रस्टच्या अध्यक्षांनी चौकशी होईपर्यंत कोणत्याही विश्वस्तांचे किंवा कर्मचाऱ्यांचे राजीनामे स्विकारू नये. कारण हिंदूंनी आपल्या घामाचा एक-एक पैसा दान पेटीत जमा केला आणि त्यावर ट्रस्टच्याच काही लोकांनी हात साफ केला.त्यामुळे संपूर्ण चौकशी होईपर्यंत आणि गुन्हेगारांना शिक्षा होईपर्यंत ट्रस्टचे सदस्य व कर्मचारी राज्याबाहेर किंवा देशाबाहेर जाणार नाही व राजीनामा देणार नाही याकडे केंद्र सरकारने व मुख्यत्वे करून रामजन्मभूमी तिर्थक्षेत्र



ट्रस्टचे अध्यक्ष महंत नृत्यगोपाल दास आणि कोषाध्यक्ष स्वामी गोविंद देव गिरी महाराज यांनी लक्ष दिले पाहिजे.श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टची निर्मिती उत्तर प्रदेश सरकारने केलेली नाही.त्यामुळे यात उत्तर प्रदेश सरकारने हस्तक्षेप न करता ही चौकशी केंद्राच्या स्वाधीन करावी. सर्वोच्च न्यायालयाच्या अयोध्या निकालाच्या अनुषंगाने फेब्रुवारी 2020 मध्ये ट्रस्टची स्थापना करण्यात आली.त्यामुळे याप्रकरणात उत्तरप्रदेश सरकारने हस्तक्षेप करू नये. चौकशीची संपूर्ण जबाबदारी केंद्र सरकारची आहे.कारण या ट्रस्टची स्थापना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार केंद्र सरकारने फेब्रुवारी २०२० मध्ये केली.या ट्रस्टचे अध्यक्ष महंत नत्यागोपाल दास आहेत, कोषाध्यक्ष स्वामी गोविंद देव गिरी महाराज,सरचिटणीस (जनरल सेक्रेटरी) चंपत राय आणि त्यांचे प्रभावशाली सदस्य डॉ.अनिल मिश्रा आहेत.आणि इतर सदस्य अशाप्रकारे १५ विश्वस्तांची (ट्रस्टी)ही कमिटी आहे. त्यामुळे देणगी चोरी प्रकरणात ट्रस्टवर ताशेरे उठत आहेत. कारण २०२० पासून देणगी स्वरुपात येणारा पैसा, सोन्या- चांदीच्या वस्तू चोरी होत असावी असाही संशय भारतीयांच्या मनात निर्माण होतो आहे किंवा प्रश्न उपस्थित होतो.त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या मार्फत ट्रस्टच्या संपूर्ण सदस्यांची व त्यांच्या परिवाराची आणि कर्मचाऱ्यांची चौकशी करून राममंदिराचा पैसा व वस्तू मंदिरापर्यंत आल्या पाहिजेत याची जबाबदारी केंद्र सरकारने स्विकारावी कारण हा घोटाळा २०२६ मध्ये लक्षात आला आहे.परंतु हा घोटाळा २०२० पासून सूरू होता याही गोष्टीला नाकारता येत नाही.२०२० पासून जर हा घोटाळा सुरू असेल तर देणगी चोरीच्या आकड्यात आश्चर्य कारक भर पडून २००० कोटी रुपयांपेक्षा जास्त सुद्धा जाऊ शकतो.कारण आस्थेच्या ठिकाणी झालेली चोरी साधुसंतांच्या प्रतिमेला मलीन करू शकते.त्यामुळे निश्पक्ष चौकशी करून गुन्हेगारांना कठोर शिक्षा ठोठावली पाहिजे.कारण मंदिराच्या उभारणीसाठी आलेल्या देणग्या आणि दानपेटीतील रकमेचे व्यवस्थापन व देखरेख या ट्रस्टद्वारे केली जाते.त्यामुळे चोरीचा ठीकरा ट्रस्टवर आहे व चोरीचे प्रथम गुन्हेगार ट्रस्ट आहेत त्यानंतर त्यांचे नातेवाईक व कर्मचारी.कारण ही देणगीची चोरी आहे त्यामुळे हे मोठे रॅकेट राहु शकते.रामजन्मभुमी ट्रस्टवर सरकारी नियंत्रण पुर्वीपासून रहाले असते तर चोरी प्रकार टळला असता.परंतु देणगी चोरीच्या प्रकरणात ट्रस्टच्या विश्वस्तांनी व तेथील कर्मचाऱ्यांनी साठगाठ करून दाणाचा पैसा आभूषणे लुटल्याचे स्पष्ट होते.त्यामुळे याप्रकरणातील एकही चोर सुटणार नाही याची खबरदारी राज्य व केंद्र सरकारने घ्यावी व यात कोणत्याही प्रकारचे राजकारण होणार नाही हेही लक्षात ठेवले पाहिजे.त्याचप्रमाणे गुन्हेगारांच्या संपत्तीवर ताबडतोब बुलडोझर चालवून त्यांना कठोर शिक्षा द्यायला हवी.जय श्रीराम!

■ **लेखक रमेश कृष्णराव लांजेवार**
( स्वतंत्र पत्रकार )

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

## थोडक्यात

### वेटरला टीप देण्याचा कारणावरून मारहाण

**नवीन पनवेल:** वेटरला टीप देण्याच्या कारणावरून बांबूने डोक्यात उपट मारून जखमी केल्याप्रकरणी आरोपी महेंद्र शेट्टी आणि हॉटेलमधील तीन ते चार वेटर यांच्या विरोधा पनवेल शहर पोलीस ठाण्यात 16 जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. प्रथमेश पवार हा सेक्टर 24, कामोठे येथे राहत असून तो त्याच्या मित्रासोबत दारू पिण्यासाठी वेलवेट हॉटेल, कोळखे येथे गेला होता. यावेळी वेटरला टीप देण्याच्या कारणावरून वेटर आणि त्यांच्यामध्ये वाद झाला. यावेळी महेंद्र शेट्टी आणि हॉटेलमधील तीन ते चार वेटर यांनी प्रथमेश याच्या डोक्यात बांबूने उपट मारली आणि लाथाबुक्क्याने मारहाण करून शिवीगाळ केली. यावेळी प्रथमेशच्या गळ्यातील सोन्याची चैन तुटून नुकसान झाले.

### 19 लाख 65 हजारांचे दागिने आणि रोख रकमेची चोरी

**नवीन पनवेल :** घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून चोरांनी 19 लाख 65 हजार रुपये किमतीचे दागिने आणि रोख रकमेची चोरी केली. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस अधिक तपास करत आहेत. यातील फिर्यादी या साई शांती भवन, सेक्टर 19, नवीन पनवेल येथे राहत असून त्यांच्या इमारतीमध्ये राहत असलेल्या त्यांचा भाचा यांच्याकडे रात्री झोपण्यास गेले होते. यावेळी चोरांनी त्यांच्या दरवाजाचे कुलूप तोडले आणि बेडरूम मधील 19 लाख 65 हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली.

# न्हावे गाव तहानलेले; पंधरा दिवसांनी फक्त अर्धा तास पाणी, ग्रामस्थांचा संताप शिगेला

» **पनवेल**



उरण: उरण: पनवेल तालुक्यातील न्हावे गावात पाणीटंचाईचे संकट दिवसेंदिवस गंभीर होत असून नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी अक्षरशः संघर्ष करावा लागत आहे. गावात ग्रामपंचायतीमार्फत तब्बल १४ ते १५ दिवसांच्या अंतराने केवळ ३० मिनिटे पाणीपुरवठा होत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रश्नावर तातडीने उपाययोजना न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामसुधारक मंडळाचे माजी अध्यक्ष योगेश कुंडलिक पाटील यांनी दिला आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून गावातील पाणीपुरवठा व्यवस्था कोलमडल्याचे चित्र दिसत आहे. नियमित पाणी न मिळाल्याने नागरिकांना मोठ्या प्रमाणावर पाणी साठवून ठेवावे लागत असून अनेक कुटुंबे खासगी टँकरच्या भरवशावर जगत आहेत. वाढत्या खर्चामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांवर अतिरिक्त भार पडत असल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, गावातील मुख्य जलवाहिनीवरून काही ठिकाणी बेकायदेशीर जोडण्या घेऊन पाणीचोरी होत असल्याचा आरोपही पुढे आला आहे. यापूर्वी अशा जोडण्यांवर कारवाई करण्यात आली होती. मात्र पुन्हा अनधिकृत पाणीउपसा सुरू झाल्याचे निदर्शनास येत असल्याने अधिकृत ग्राहकांच्या वाट्याला येणारे पाणी कमी होत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. त्यामुळे पाणीचोरी करणाऱ्यांविरोधात कठोर दंडात्मक कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

योगेश पाटील यांनी सांगितले की, न्हावे गावाचा पाणीप्रश्न सोडवण्यासाठी संबंधित प्रशासन, सिडको अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी तातडीने हस्तक्षेप करणे आवश्यक आहे. मात्र अद्याप कोणतीही प्रभावी उपाययोजना दिसून येत नसल्याने नागरिकांमध्ये असंतोष वाढत आहे.

गावातील बिकट परिस्थिती लक्षात घेता तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा, तसेच जलवाहिन्यांवरील अनधिकृत जोडण्यांची विशेष मोहीम राबवून तपासणी करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

पाणीपुरवठ्यातील अनियमिततेमुळे नागरिकांना दीर्घकाळ पाणी साठवून ठेवावे लागत असल्याने पाणी दूषित होण्याचा धोकाही वाढला आहे. परिणामी संसर्गजन्य आजार फैलावण्याची भीती व्यक्त केली जात असून हा प्रश्न आता केवळ पाणीपुरवठ्यापुरता मर्यादित न राहता सार्वजनिक आरोग्याशी निगडित गंभीर समस्या बनला आहे.

"नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे. प्रशासनाने तातडीने पाणीचोरी रोखावी, टँकरची व्यवस्था करावी आणि कायमस्वरूपी तोडगा जाहीर करावा. अन्यथा ग्रामस्थांना लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारावे लागेल," असा इशारा ग्रामसुधारक मंडळाचे माजी अध्यक्ष योगेश कुंडलिक पाटील यांनी दिला.



### आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त तळोज्यात हरित संदेश;

# विद्यार्थ्यांच्या सहभागातून वृक्षारोपण अभियान यशस्वी

» **पनवेल:**

युवा सेना प्रमुख तथा शिवसेना नेते आमदार आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबविण्याच्या आवाहनाला तळोज्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कमलगौरी पाटील शिक्षण संस्थेच्या वतीने संस्थेच्या परिसरात भव्य वृक्षारोपण अभियान आयोजित करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.

शिवसेना उपनेते तथा संस्थेचे अध्यक्ष बबनदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमात विविध प्रकारच्या फळझाडांसह पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाची सामूहिक जबाबदारी अधोरेखित करण्यात आली. तसेच वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना लाडू वाटप करून आनंदोत्सवही साजरा करण्यात आला.





यावेळी उपस्थितांना संबोधित करताना बबनदादा पाटील यांनी वृक्षारोपणासोबतच वृक्षसंवर्धनाचे महत्त्व विशद केले. "झाडे लावणे ही चांगली सुरुवात असली तरी त्यांचे संगोपन आणि संरक्षण करणे तितकेच आवश्यक आहे. आज लावलेली झाडे पुढील वर्षी भरभरून वाढलेली आणि फळधारणा केलेली पाहण्याचा आमचा निर्धार आहे," असे त्यांनी सांगितले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण झाली असून झाडांची नियमित निगा राखण्याचा संकल्पही त्यांनी व्यक्त केला. आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या सामाजिक उपक्रमामुळे परिसरात सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून हरित उपक्रमांची नवी प्रेरणा मिळाली आहे.

कार्यक्रमास शिवसेना उपनेते बबनदादा पाटील, उपजिल्हाप्रमुख रामदासदादा पाटील, शहरप्रमुख प्रदीप केणी, विभागप्रमुख मिथुन मढवी, एस.व्ही. कॉलेजचे प्राचार्य डॉ. राहुल डोंगरगावकर, बबनदादा पाटील फिजिओथेरपी कॉलेजचे प्राचार्य डॉ. मनोज अग्निहोत्री, बी.के. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. अक्षय मेश्राम, प्राचार्य अर्चना हिवसे, प्राचार्य प्राची गाडे, शिक्षकवृंद, विद्यार्थी तसेच शिवसेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) च्या 27 व्या वर्धापन दिनानिमित्त भव्य मेळावा




» **पनवेल:**

उरण: राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) च्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे आयोजित भव्य मेळाव्यात पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांचा उत्साह ओसंडून वाहताना दिसला. राज्यभरातून आलेल्या हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यात उरणच्या नगराध्यक्ष भावनाताई घाणेकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार, कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे आणि प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. यावेळी प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या हस्ते भावनाताई घाणेकर यांना सन्मानपत्र प्रदान करून त्यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा गौरव करण्यात आला.

उरण शहराच्या विकासासाठी, महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविणाऱ्या भावनाताई घाणेकर यांच्या कार्याची दखल पक्षश्रेष्ठींनी घेतल्याने उरणमधील राष्ट्रवादी कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या प्रसंगी मार्गदर्शन करताना शरद पवार यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये महिलांना ५० टक्के प्रतिनिधित्व देण्याची भूमिका स्पष्ट केली. महिलांना संधी मिळाल्यास त्या सक्षम नेतृत्व सिद्ध करू शकतात, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी पक्षातील महिला नेतृत्वाला अधिक बळ देण्याचा निर्धार व्यक्त केला.

पक्षातील फूटीनंतरही विचारांशी निष्ठा राखणाऱ्या कार्यकर्त्यांचे कौतुक करताना पवार म्हणाले, "संकटाच्या काळात जे कार्यकर्ते विचारांशी एकनिष्ठ राहिले, त्यांच्याच बळावर पक्षाची वाटचाल अधिक सक्षमपणे सुरू आहे. विचार जिवंत राहिले तर सत्ता पुन्हा मिळविणे अवघड नाही."

'तुतारी फुंकणारा माणूस' या पक्षचिन्हाच्या घोषणांनी दुमदुमलेल्या सभागृहात आगामी महापालिका निवडणुकांचे रणशिंगही फुंकले गेले. राज्याच्या राजकारणात नव्या समीकरणांची चाहूल देणारा हा वर्धापन दिन सोहळा विशेष चर्चेचा विषय ठरला.

भावनाताई घाणेकर यांच्या सत्कारानंतर उरणमधील कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त करत, "शरद पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली उरणच्या कन्येचा झालेला हा सन्मान संपूर्ण शहरासाठी अभिमानाची बाब आहे," अशा भावना व्यक्त केल्या.

# नोकरी मिळवून देतो असं सांगून एक कोटी 73 लाख 81 हजारांची फसवणूक

**नवीन पनवेल :** नोकरी मिळवून देतो असे सांगून एक लाख 73 लाख 81 हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी आठ जणांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. 28 मे 2026 ते जून 2026 पर्यंत एवॉन शिपिंग कंपनी, लँडमार्क बिल्डिंग, सेक्टर सात, खारघर येथे फिर्यादी पंकज सिंग (वय 23 राहणार कळंबोली) याला शिपिंग कंपनीमध्ये नोकरी लावून देतो असे सांगून कंपनीतील मालक आणि स्टाफ यांनी पंकज आणि इतर 75 मुलाकडून एक कोटी 73 लाख 81 हजार रुपये स्वीकारले आणि नोकरीला न लावता सर्वांची फसवणूक केली. या प्रकरणी अंजली वर्मा, सत्यम वर्मा, अनुज सिंग, बादल रॉय, विकास रॉय, कशिश, रीना, माधुरी यांच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# आयआयटी मद्रासमधून एम.टेक. पूर्ण करणाऱ्या आदित्य जोशीचा नगराध्यक्षांच्या हस्ते गौरव

**म्हसळा:** म्हसळा शहरातील युवक आदित्य महेंद्र जोशी याने प्रतिष्ठित आयआयटी मद्रास येथून एम.टेक. पदवी यशस्वीरित्या संपादन करत शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या यशाबद्दल म्हसळा नगरपंचायतीच्या वतीने त्याचा विशेष सत्कार करण्यात आला.

नगराध्यक्ष सुनिल शेडगे यांच्या हस्ते आदित्य जोशी यांना शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या. आदित्यच्या यशामुळे म्हसळा शहराच्या शैक्षणिक नावलौकिकात भर पडल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

कार्यक्रमादरम्यान शिवसेनेचे रायगड जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर यांनीही आदित्यचे अभिनंदन केले. त्यांनी त्याच्या भावी करिअरविषयी चर्चा करत आवश्यक ते मार्गदर्शन व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

या प्रसंगी उपनगराध्यक्षा कमल जाधव, गटनेते संजय कर्णिक, माजी नगराध्यक्ष अनिकेत पानसरे, गौरी करडे, कासिम मेमन, शिवसेना म्हसळा तालुकाप्रमुख अमित महामुणकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मध्यमवर्गीय कुटुंबातून आलेल्या आदित्यने लहानपणापासूनच शिक्षणात सातत्याने प्राविण्य मिळविले आहे. नव्या ज्ञानाचा शोध घेण्याची जिद्द आणि मेहनतीच्या बळावर त्याने आयआयटी मद्रासमधून एम.टेक. पदवी संपादन केली. भविष्यात संशोधन क्षेत्रात योगदान देण्यासाठी पीएच.डी. करण्याची इच्छा असल्याचेही त्याने यावेळी सांगितले.

आदित्यच्या या यशामुळे म्हसळा परिसरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, स्थानिक तरुणांसाठी तो प्रेरणादायी ठरत आहे.



दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
● बीड, सोमवार 29 जून 2026
Last page




# खडकाळ माळरानावर फुलवलं डाळिंबाचं नंदनवन: आष्टीच्या युवा शेतकऱ्याची 60 लाखांच्या उत्पन्नाची यशस्वी यशोगाथा!

**संतोष सानप | आष्टी**

अतिशय खडकाळ आणि माळरान जमिनीवर जर योग्य नियोजन, अपार कष्ट आणि योग्य मार्गदर्शनाची जोड मिळाली, तर शेतीमधूनही कशाप्रकारे नंदनवन फुलवता येते, याचे एक आदर्श आणि प्रेरणादायी उदाहरण आष्टी तालुक्यातील भातोडी येथील युवा शेतकरी शंकर गीते यांनी समोर ठेवले आहे. कोणतीही प्रतिकूल परिस्थिती माणसाला अडवू शकत नाही, हेच त्यांनी आपल्या शेती प्रयोगातून सिद्ध करून दाखवले आहे.

शंकर गीते यांनी त्यांच्या अडीच एकर खडकाळ क्षेत्रामध्ये 'भगवा' या दर्जेदार जातीच्या डाळिंबाची लागवड करण्याचा धाडसी निर्णय घेतला. त्यांनी १४ बाय ८ अंतरावर एकूण ११०० रोपांची शास्त्रोक्त पद्धतीने लागवड केली. बागेच्या पोषणासाठी त्यांनी रासायनिक आणि सेंद्रिय (ऑरगॅनिक) खतांचा अतिशय संतुलित व योग्य वापर केला. माळरान जमिनीवर सर्वात मोठे आव्हान होते ते पाण्याच्या नियोजनाचे. या पाणीटंचाईवर मात करण्यासाठी त्यांनी एक एकर क्षेत्रामध्ये दोन शेततळे तयार करून पाण्याचे चोख नियोजन केले. पहिल्या वर्षी त्यांना या सर्व उभारणीसाठी आणि व्यवस्थापनासाठी ७ ते ८ लाख रुपयांचा खर्च आला.



परंतु, त्यांच्या कष्टाला आणि नियोजनाला लवकरच फळ आले. पहिल्याच वर्षी त्यांच्या डाळिंब बागेला उत्कृष्ट फळे लागली. पहिल्याच वर्षी त्यांना तब्बल २७ लाख रुपयांचे भरघोस उत्पन्न मिळाले. हाच यशाचा आलेख दुसऱ्या वर्षी आणखी उंचावला आणि त्यांना ४१ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले. तर चालू सीजनमध्ये बागेची स्थिती अतिशय उत्तम असून अंदाजे ३५ टन माल निघण्याची दाट शक्यता आहे, ज्यातून यावर्षी त्यांना ६० लाख रुपयांचे विक्रमी उत्पन्न मिळण्याचा अंदाज आहे. अतिशय खरपाड आणि नापीक समजल्या जाणाऱ्या जमिनीवर योग्य व्यवस्थापनाच्या जोरावर त्यांनी डाळिंबाचे नंदनवन फुलवून दाखवले आहे.

त्यांच्या या यशामागे आष्टी तालुक्याचे कृषी अधिकारी गोरख तरटे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तालुक्यातील इतर यशस्वी फळबागांची पाहणी करून आणि कृषी अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानेच त्यांनी 'भगवा' डाळिंबाची निवड केली आणि ती पूर्णपणे यशस्वी करून दाखवली.

यशोगाथा सिद्ध करते की, आधुनिक तंत्रज्ञान, पाण्याचे योग्य नियोजन, योग्य वाणाची निवड आणि कृषी तज्ज्ञांचे मार्गदर्शन यांच्या बळावर आजचा तरुण शेतकरी कोरड्या माळरानावरही यशाची मोठी शिखरं सर करू शकतो.

### शेती व्यवसायातही चांगल्या मार्गदर्शक गुरुची गरज

**आपण कोणताही उद्योग, व्यवसाय किंवा नोकरी करताना आपल्याला एखाद्या गुरूची आवश्यकता भासते. त्या गुरूच्या मार्गदर्शनाखाली जर आपण सातत्याने काम करत राहिलो, तर यश नक्कीच संपादन होते. अगदी तसेच शेती करण्यासाठी देखील एका चांगल्या गुरूची अत्यंत आवश्यकता आहे. गुरूच्या योग्य मार्गदर्शनाखाली शेतीमध्ये कष्ट उपसल्यास यश निश्चित मिळते. असेच मला डॉक्टर दीपक मोरे हे गुरु मिळाले त्यांनी केलेले मार्गदर्शन आणि माझे कष्ट कामी आले असून मला डाळिंबामधून चांगले आणि भरघोस उत्पन्न मिळाले आहे.**

**- शंकर गीते, डाळिंब उत्पादक शेतकरी भातोडी**

# त्रिमूर्ती सरकारच्या लाडक्या पिक विमा कंपन्यांनी शेतकऱ्याला विमा न देण्याचे कारण सांगावे : वसंत मुंडे

**मुंबई (प्रतिनिधी)**



महाराष्ट्रात २०२० पासून आज पर्यंत त्रिमूर्ती सरकारचा राजआश्रय असल्यामुळे शेतकऱ्याला पिक विमा कंपन्या हक्काचा विमा वितरित करीत नाहीत असा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. ईडी व त्रिमूर्ती सरकारने सरकारच्या विमा कंपनीकडून कामे काढून घेऊ सन २०१६ पासून खाजगी विमा कंपन्यांना राज्यातील कामे दिली. त्यामध्ये विमा कंपन्यांना २० ते ३० टक्के कमिशन शासनाकडून नियमानुसार प्रत्येक कंपनीला दिले जाते.शेतकऱ्यांनी शासन स्तरावर अनेक पुराव्यासहीत लेखी तक्रारी केल्या आहेत, तसेच शेतकऱ्यांनी उच्च न्यायालया पर्यंत पिक विमा संदर्भात याचिका दाखल करून त्वरित पीक विम्याचे पैसे शेतकऱ्याला देण्यात यावेत असे आदेश उच्च न्यायालयाचे असूनही अंमलबजावणी करण्यात त्रिमूर्ती सरकार हे अकार्यक्षम आहे. सन २०२० पासून आज पर्यंत खाजगी पिक विमा कंपन्याकडून कृषीचे प्रशासकीय अधिकारी आजी माजी मंत्री यांनी सर्व कंपन्याकडून टक्केवारी घेतल्यामुळे शेतकऱ्याला विमा मिळत नाही.पिक विमा कंपन्यावर शासनाचे नियंत्रण नाही सर्व स्तरात पिक विमा मिळण्यास शेतकऱ्याला अडचणी निर्माण होत आहेत, तरी ही शासनाकडून पिक विमा कंपन्यावर काळया यादीत टाकण्याची कारवाई केली जात नाही. २०२५ च्या पीक विम्या संदर्भात तर अतिवृष्टीमुळे हाहाकार माजलेला होता सर्व स्तरावर पिकांची शेतकऱ्याची प्रचंड नुकसान झालेली आहे. तरी ही खाजगी पिक विमा कंपन्यांनी पर्जन्यमापक यंत्रणा व हवामान केंद्राचे अधिकारी तसेच महसूल, कृषी अधिकारी ,लोकप्रतिनिधी, आजी माझी कृषिमंत्री कृषी आयुक्त, सांख्यिकी विभागाचा प्रमुख यांच्याबरोबर टक्केवारी देऊन तडजोड केल्यामुळे शेतकऱ्याला पिक विमा मिळण्यास अडचण निर्माण झाली आहे असा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला.

# सुलेमान देवळा प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत 3179 बालकांना पल्स पोलिओ लसीकरण

## वैद्यकीय अधिकारी डॉ शेख महेविशआरा व डॉ शेख फबिया यांचे उत्कृष्ठ नियोजन

**आष्टी | प्रतिनिधी**

तालुक्यातील सुलेमान देवळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ शेख महेविशआरा व डॉ शेख फबिया यांनी केलेल्या उत्कृष्ठ नियोजनामुळे 43 बूथ व 2 मोबाईल टीम कार्यरत करण्यात आले होते. यावेळी 3179 बालकांना पल्स पोलीओ लसीकरण करण्यात आले. या केंद्राला बीडचे डी टी ओ डॉ माने यांनी भेट देऊन समाधान व्यक्त करत दोन्ही वैद्यकीय अधिकाऱ्यांचे कौतुक केले.



बीड जिल्ह्यातील सर्वात मोठे प्राथमिक आरोग्य केंद्र म्हणून अस्तित्वात असलेले सुलेमान देवळा प्राथमिक आरोग्य केंद्र पल्स पोलिओ लसीकरण मोहीमेची सुरूवात ग्रामपंचायत सदस्य शिवम दिगंबर घोडके यांच्या हस्ते मुलांना लस पाजुन उद्घाटन करण्यात आले. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ शेख महेविशआरा, डॉ शेख फबिया व कर्मचारी वेळेत उपस्थित होते. पल्स पोलिओ लसीकरण मोहीम घराघरापर्यंत पोहोचण्यासाठी योग्य त्या सूचना शेख मॅडम यांनी कर्मचाऱ्यांना दिला होत्या. आरोग्य केंद्र अंतर्गत 44 गाव असल्याकारणाने, प्रत्येक गावात वस्तीवर जाऊन शंभर टक्के पल्स पोलिओ लसीकरण करून घेण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते परमेश्वर रामचंद्र घोडके यांनी यांनीही मदत केली.

लसीकरण करण्यासाठी गावातील व परिसरातील नागरिक आपापल्या मुलांना घेऊन प्राथमिक आरोग्य केंद्रात मोठ्या उत्साहाने सहभागी होत होते. यावेळी गावचे पोलीस पाटील शशुभम पांडुरंग घोडके हे उपस्थित होते. लसीकरण मोहीम यशस्वी होण्यासाठी, वैद्यकीय अधिकारी डॉ शेख महेविशआरा, डॉ शेख फबिया, श्री तेरोले, श्री. सरोदे भैर, सानप, श्रीमती पडोळे, गायकवाड, घोडके, गुगळे मॅडम सह सर्व कर्मचारी यावेळी उपस्थित राहून पल्स पोलिओ लसीकरण ही राष्ट्रीय मोहीम यशस्वी करण्यासाठी कष्ट करत होते. या लसीकरण मोहिमेत सर्वांनी सहभागी होऊन पोलिओमुक्त महाराष्ट्र घडवण्यासाठी पुढे यावे असे ग्रामपंचायत सदस्य शिवम घोडके यांनी आवाहन केले होते.

## विषबाधा होऊन दोन जनावरे दगावली

# विधवा महिलेस आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून ५० हजाराची मदत

**लातूर | प्रतिनिधी**



शेतकऱ्यांच्या जमिनी करून पोटाची खळगी भरणाऱ्या विधवा महिला शेतकऱ्याच्या दिव्यांग कुटुंबात एका बैलाचा पेरणीच्या तोंडावर विषबाधेमुळे मृत्यू झाला, तर उदरनिर्वाहाचा आधार असलेली दूध देणारी म्हैसही मरण पावल्याने अडचणीत सापडलेल्या लातूर तालुक्यातील मौजे बोरगाव काळे येथील या कुटुंबाला लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी वैयक्तिक रित्या ५० हजाराची मदत करून शासनाच्या माध्यमातून विविध योजनेचा आणि मदतीचा लाभ मिळवून देण्याची ग्वाही दिली.

लातूर तालुक्यातील मौजे बोरगाव काळे येथील अल्पभूधारक शेतकरी ७५ वर्षीय भागीरथीबाई भानुदास पवार या आपल्या दोन मूकबधिर दिव्यांग हनुमंत आणि दत्ता या मुलाच्या मदतीने इतर शेतकऱ्यांची शेती करून त्यावरच उदरनिर्वाह भागवतात. सध्या पेरणीची लगबग सुरू असून बैलाला अचानक विषबाधा झाली आणि त्यातच त्याचा मृत्यू झाला. आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने नवीन बैल खरेदीसाठी या कुटुंबाला संघर्ष करावा लागत असतानाच संसाराला हातभार लावणारी दुधाळ म्हैसही विषबाधेमुळे तिचाही मृत्यू झाला. दुधाच्या माध्यमातून मिळणारे चार पैसेही बंद झाल्याने गरीब कुटुंब अडचणीत सापडले.

पंचवीस वर्षांपूर्वी स्वतःचा नवरा जग सोडून गेला असताना दोन्ही मूकबधिर मुलांना सोबत घेऊन जीवनभर संघर्ष करणाऱ्या भागीरथीबाई भानुदास पवार या अल्पभूधारक शेतमजुरी करणाऱ्या कुटुंबावर ओढावलेल्या संकटात दिलासा देण्याचे काम लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी केले आहे. रविवारी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात आ. रमेशआप्पा कराड यांनी वैयक्तिकरित्या ५० हजार रुपयाची मदत केली त्याचबरोबर शासनाच्या विविध योजनेचा लाभ मिळून देण्याची आणि मदत करण्याची यावेळी ग्वाही दिली. याप्रसंगी पवार कुटुंबातील मूकबधिर हनुमंत पवार, दत्ता पवार यांच्यासह भाजपाचे दशरथ सरवदे, बोरगाव काळे येथील प्रशांत साखरे, बाबासाहेब काळे, सुर्यकांत सोनवणे, खंडू आवटे यांची उपस्थिती होती.

# वहिरा येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात पल्स पोलिओ मोहीम संपन्न



**प्रतिनिधी | सोपान पगारे**

वहिरा येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात आज राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम मोठ्या उत्साहात पार पडली. सकाळी 8 वाजल्यापासूनच पालक आपल्या 0 ते 5 वयोगटातील बालकांना घेऊन केंद्रावर येत होते.

या मोहिमेचे उद्घाटन सरपंच, उपसरपंच व वैद्यकीय अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. अंगणवाडी सेविका सुभद्रा थोरवे व आशा वर्कर मुक्ता जेधे यांच्यासह आरोग्य कर्मचाऱ्यांनी घरोघरी निरोप पोहचूण बालकांना लस देण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

गावातील नागरिकांनीही या मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. "पोलिओमुक्त भारत" या संकल्पनेसाठी सर्वांनी एकत्र येऊन सहकार्य केले. आजच्या मोहिमेत 30 पेक्षा अधिक बालकांना पोलिओची लस देण्यात आली.

यावेळी वैद्यकीय अधिकारी एम. टी. विटकर म्हणाल्या, "पोलिओचे उच्चाटन करण्यासाठी प्रत्येक बालकापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. नागरिकांच्या सहकार्यामुळेच आजची मोहीम यशस्वी झाली. एकही बालक लसीपासून वंचित राहू नये यासाठी आमचा प्रयत्न सुरूच राहील."

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आरोग्य विभागाचे कर्मचारी, शिक्षक व ग्रामस्थांनी मोलाचे योगदान दिले.